बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ३७ | बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## आरक्षण रक्षणार्थ २१ ऑगस्ट रोजी भारत बंद

**गोंदिया–** सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच अनु. जाती, जमातीमध्ये उपवर्ग निर्माण करून क्रिमीलेयर लावण्याच्या निर्णय दिला आहे. यामुळे आमचे आरक्षण संपुष्टात येणार आहे.आम्हाला मिळालेले आरक्षण आर्थिक आधारावर नसून वर्षानुवर्षाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपनाच्या आधारावर आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अनु. जाती, जमाती प्रवर्गाच्यावतीने २१ ऑगस्ट रोजी भरत बंदची हाक देण्यात आली आहे.

या अनुषंगाने गोंदिया बंदमध्ये सहभागी होऊन सहकार्य करण्याचे आवाहन एससी, एसटी, ओबीसी आरक्षण बचाव समिती गोंदियातर्फे येथील शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेतून केले आहे.



पुढे समितीच्या पदाधिकारी यांनी त्यांच्या प्रमुख मागण्यांवर माहिती देताना सांगीतले, २१ रोजी सकाळी ९.३० वाजता स्थानिक प्रशासकीय इमारतीसमोर मोर्चा काढून खालील मागण्यांचे निवेदन शासनाला पाठविण्यात येईल. मागण्यांमध्ये केंद्र सरकारने संसदेचे विशेष सत्राद्वारे अध्यादेश काढून तत्काळ अनुसूचित जाती, जमातींच्या प्रवर्गातील प्रस्तावित जातींचे उपवर्गीकरण आणि क्रिमिलेअरचा निर्णय रद्द करावी,ओबीसी प्रवर्गाला लाव–लेली क्रिमिलेयरची अट सुध्दा रद्द करण्यात यावे. त्याविषयी संसदेत कायदा पारित करून अशाप्रकारचे उपवर्गीकरण अथवा क्रिमिलेअर लावण्यात येणार नाही याची हमी द्यावी, अनुसूचित जाती, जमातींचे आरक्षण सविंधानाच्या नवव्या अनुसूचिमध्ये समाविष्ट करावे,सर्वांची जातीनिहाय जनगणना करून, जातनिहाय सर्वांना लोकसंख्येच्या प्रमाणात शंभर टक्के आरक्षण द्यावे,खासगी आस्थापनांमध्ये एससी, एसटी, ओबीसी प्रवर्गाला आरक्षण लागू करावे,उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांची नियुक्ती न्यायिक नियुक्ती आयोग गठीत करून परीक्षा घेवून करावी, शासकीय नोकरीमधील अनुशेष तत्काळ भरण्यात यावा, ओबीसी प्रवर्गातील किमिलेअरची अट रद्द करावी आदी मागण्या असल्याचे त्यांनी सांगीतले.

यावेळी पंकज वासनिक,देवा रुसे,नरेंद्र मेश्राम,ज्योतिप्रकाश गजभिये,उत्तम मेश्राम,सोमेंद्र डहाट,मालती किन्नाके,निशा मेश्राम,हेमलता आहाके,शितल उईके,छाटू बोरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या बंदला गोंदिया जिल्ह्यातील सर्व बहुजन संघटनांनी आ–पला पाठिंबा जाहीर केला असून गोंदिया जिल्हा व्यापारी फेडरेशनने सुध्दा पाठिंबा दिला आहे.ओबीसी संघटनानी सुध्दा या आंदोलनाला आपला पाठिंबा जाहिर केला आहे.

## जुन्या पेंशनकरीता २९ ऑगस्टपासून राज्य शासकीय,निम्म शासकीय कर्मचारी संपावर



गोंदिया– महाराष्ट्र राज्यातील राज्य शासकीय निम्न शासकीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय व हक्काची मागणी जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतच्या शासनाच्या उद–ासीन धोरणामुळे राज्यातील सर्व कर्मचारी वर्गात तीव्र असंतोषाचे भावना निर्माण झालेली आहे. जुनी पेन्शन योजना तात्काळ लागू करण्यात यावे या प्रमुख मागणीसह इतर मागण्या तात्काळ निघ–ाली काढण्यात यावात यासंदर्भात तील शासनाला दिलेल्या नोटीस नुसार राज्यातील सर्व विभागाचे शासकीय निम्न शासकीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी दिनांक २९ ऑगस्ट २०२४ पासून संपावर जात असल्याचे निवेदन मध्यवर्ती समन्वय समितीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मुरगानंथम यांना देण्यात आले.

सविस्तर असे की मागील अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत निवेदन करून कर्मचाऱ्यांना आस्वस्थ केले होते की जुन्या पेन्शनचे सर्व लाभ तत्वतः मान्य करून नवीन पेन्शन योजना राज्यातील सर्व कर्मचा?्यांना लागू करण्यात येईल या नवीन योजनेमध्ये जुन्या योजनेत समाविष्ट असलेले सर्व लाभ दिले जातील व लवकरच याकरता गठीत केलेली समिती आपला अहवाल देऊन जुन्या पेन्शन प्रमाणेच लाभ देणारी नवीन पेन्शन योजना राज्यात लागू केली जाईल या आश्वासनानंतर राज्यातील कर्मचाऱ्यांच्या मध्यवर्ती समन्वय समितीच्या सुकाणू समितीने राज्यात उभारलेला संप स्थगित केला होता.

मात्र आज रोजी पर्यंत सुद्धा शासनाने आपला शब्द पूर्ण केला नाही.त्यामुळे पुन्हा कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष उफाळून आला आहे त्याचे परिणाम स्वरुप पुन्हा संपाची हाक राज्य कर्मचाऱ्यांनी दिली आहे.

यानुसार शासनाला संपाची नोटीस देण्यात आलेली असून त्यातीलच एक टप्पा म्हणून गोंदिया जिल्ह्यातील समन्वय समितीचे नेते लीलाधर पाथोडे ,कमलेश बिसेन जिल्हाध्यक्ष ,पी.जी.सहारे,चंदू वैद्य,राकेश डोंगरे ,आशिष रामटेके, संतोष तोमर ,भगीरथ नेवारे,नामपल्लीवार ,एन यू कावले ,संतोष तुरकर ,सुभाष खत्री ,गोवर्धन बिसेन ,यज्ञेश माना–पुरे, कुमारी चित्रा ठेंगरी, आनंद चर्जे ,तेजस्विनी चेटूले, राजेश कुंभलवार ,गितेश तिजारे ,गोपाल शर्मा, मनोज मानकर ,टेकचंद चौधरी, अभिजीत बोपचे ,निखिल बागडे, प्रमोद काळे ,सौरभ अग्रवाल आदी शिष्टमंडळ मध्ये समाविष्ट होते.

## आंतरराष्ट्रीय बौध्द धम्म परिषद २५ ऑगस्टला सडक अर्जुनी येथे



**सडक अर्जुनी–** राज–कुमार बडोले फाऊंडेशन,बुध्दिष्ट सोसायटी ऑफ इंडिया,गगन मलिक फाऊंडेशन,तथा त्रीरत्न भुमी सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय बौध्द धम्म परिषद तथा बुध्द मुर्ती वाटप आणि धम्म स्कुलचे उदघाटन २५ ऑगस्टला सकाळी ११ वाजता आशीर्वाद लॉन सडक /अर्जुनी येथे आयोजित करण्यात आले आहे.या आंतरराष्ट्रीय धम्म परिषदेला देश,विदेशातील भंते प्रामुख्याने उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत.

आंतरराष्ट्रीय बौध्द धम्म परिषदेचे उदघाटन माजी सचीव अनु.जाती–जमाती आयोग म.रा.विभाग प्रमुख मुंबई विद्या–पीठ प्रा.डॉ.संदेश वाघ,गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे कुलसचीव यांचे हस्ते होईल.अध्यक्षस्थानी उप मठाधीस ,वाट थाथोंग–शाही मठ बॅकॉक,थायलंड राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणुन माजी सामाजीक न्याय मंत्री राजकुमार बडोले राहणार आहेत. विशेष वंदनीय भंते म्हणुन प्रशासनिक कार्यालय वाट थाथोंग–शाही मठ बॅकाक थाईलॅडचे भंते फ महा सिरीचय यनावत्थानो,गुजरातचे भंते प्रशिलरत्न गौतम,डव्वा येथील भंते संघधातु, औरंगाबाद येथील भंते धम्मज्योती प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. तर विशेष अतिथी म्हणुन चित्रपट अभिनेते गगन मलिक,बॅकाक थाईलॅडचे कॅ.डॉ. नटकीट सी.मंगल, भारतिय बौध्द महासभेचे अध्यक्ष डॉ. चंद्रबोधी पाटील, गोंदिया–भंडारा संपर्क प्रमुख विरेंद्र अंजनकर,अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. वर्षा गंगणे, अर्जुनी मोर.चे उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे, कृऊबा संचालिका शारदाताई बडोले, कृऊबा सभापती डॉ. अविनाश काशीवार, कृऊबा सभापती यशवंत परशुरामकर, तहसिलदार अनिरुद्ध कांबळे, तहसिलदार अक्षय पोयाम, उपविभागीय अभियंता राहुल टेभुर्णे, राजहंस ढोक, झाडीपट्टीच्या कवियत्री अंजनाताई खुणे, तिबेटियन वस्तीचे अध्यक्ष चो ग्याल्टसेन, महामंत्री रचनाताई गहाणे, सामाजीक कार्यकर्ते शब्बिरभाई पठाण विभागात कार्यरत जेष्ठश्रेष्ठ कार्यकर्ते, वरिष्ठ पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

या आंतरराष्ट्रीय बौध्द धम्म परिषदेचे औचित्य साधुन अर्जुनी मोर. विधानसभा अंतर्गत ज्या गावातील बौध्द विहारात बुध्द मुर्ती वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. आज जगाला युध्द नको तर बुध्द हवा याच आधारावर या आंतरराष्ट्रीय बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषद मधे अर्जुनी मोर. विधानसभा क्षेत्रातील तथा गोंदिया, भंडारा जिल्ह्यातील सर्व महिला, पुरुष व युवक, युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राजकुमार बडोले फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## ओबीसी विभागात बाह्य यंत्रणेकडून भर्ती

**नागपूर :** राज्य सरकारने कंत्राटी भरती करणार नसल्याचे जाहीर केल्यानंतरही इतर मागास बहुजन कल्याण विभागात (ओबीसी) बाह्य यंत्रणेकडून कंत्राटी भरती केली जात आहे. कंत्राटी भरतीमध्ये मागासवर्गीय समाजाला आरक्षण मिळणार नसल्याने विविध ओबीसी संघटनांनी यास विरोध केला आहे. कर्मचाऱ्यांची नियमित भरती करण्याचे सरकार टाळत असल्याबाबत नाराजीही व्यक्त करण्यात आली आहे. बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटी भरतीसाठी ३१ आक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार एजन्सी पॅनल नियुक्तीचा जुना जीआर रद्द करण्यात आला. त्यामुळे या आधीच्या जीआरनुसार पात्र ठरलेल्या नऊ एजन्सींकडून २१ ऑक्टोबर २०२३ पासून सेवा घेता येत नाही. पण, ज्यांनी जुन्या जीआरच्या आधारे ज्या एजन्सीकडून मनुष्यबळ सेवा घेतल्या असतील त्यांना नऊ महिन्यांची मुभा देण्यात आली. त्यानुसार २० जुलै २०२४ ला सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त झाली आहे. यामुळे ओबीसी विभागाचे विविध कार्यालय व चालू वर्षापासून सुरू होत असलेल्या वसतिगृहांमध्ये कर्मचाऱ्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे.मनुष्यबळाअभावी ओबीसी विभागाचे कामकाज जवळपास ठप्प झाले आहे. ही संधी साधून ओबीसी विभागाने बाह्य यंत्रणेकडून कंत्राटी भरती करण्याचा घाट रचला आहे. कंत्राटी भरती करण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. यास विरोध सुरू झाला आहे.राज्य सरकार कंत्राटी भरती करणार नसल्याचे वारंवार जाहीर करते. मात्र, प्रत्यक्षात कंत्राटी भरती करीत आहे. या भरतीमध्ये ओबीसी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील उमेदवारांना आरक्षण मिळू शकत नाही. राज्य सरकारने सर्व विभागात शासकीय भरती करावी, अशी मागणी ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक उमेश कोर्राम यांनी केली आहे.

## मनसे प्रमुख राज ठाकरे आज गोंदियात

**गोंदिया–** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर केली नसली तरी महाराष्ट्र राज्याला विधानसभा निवडणुकीची चाहूल लागलेली आहे आणि त्याकरिता प्रत्येक पक्षाने आपापली पक्ष बांधणी, मोर्चे बांधणीला सुरुवात केलेली आहे. या अंतर्गत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा गोंदिया जिल्हा दौरा बुधवार २१ ऑगस्ट रोजी होणार आहे. या दरम्यान त्यांच्या स्वागताकरिता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गोंदिया जिल्ह्यातील पदाधिकारी व त्यांच्या समर्थकांनी लावलेल्या स्वागत फ्ल लकावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा भावी मुख्यमंत्री, असा उल्लेख करण्यात आला आहे.






बुधवार दि. 21 अगस्त 2024

भारत बंद...
गोंदिया बंद...

साथीयो,

सर्वोच्च न्यायालय द्वारा SC, ST आरक्षण के खिलाफ दिये गऐ फैसले के विरोध मे 21 अगस्त 2024 को भारत बंद... गोंदिया बंद... का आवाहन किया गया है।

समस्त SC, ST, OBC के छात्रों, नौजवानों एंव नागरीकों ने इसके खिलाफ सडक पर उतरकर अपने आवाज को बुलंद कर अपने हक, अधिकार की लडाई मे भारी संख्या में शामील हो...

समय : सुबह 7.00 शाम 6.00 तक
स्थान : डॉ. आंबेडकर चौक, नई प्रशासकिय इमारत के सामने गोंदिया



निकलों बाहर मकानों से...
जंग लढो बेईमानों से...



: मांगे :

1) संविधान विरोधी सुप्रिम कोर्ट के फैसले को तुरंत रद्द किया जाएं ।
2) अनुसुचित जाती, जनजाती का आरक्षण संविधान की 9 वी अनुसूचि में शामिल किया जाएं ।
3) सरकारी आस्थापना में SC, ST का बॅकलॉग अनुशेष तुरंत भरा जाएं एवं निजी क्षेत्र मे आरक्षण लागु किया जाएं ।
4) जाती निहाय जनगणना किया जाऐं तथा ओ.बी.सी. को क्रिमीलेअर की शर्त रद्द कि जाएं ।
5) मुस्लिम वक्फ बोर्ड संशोधन बिल तुरंत वापस लिया जाएं ।
6) उच्च एंव सर्वोच्च न्यायालय में न्यायाधीशों की भर्ती कॉलेजीयम सिस्टम रद्द कर न्यायीक आयोग द्वारा परिक्षा लेकर कि जाएं ।

: विनीत :

- विश्वभूषण भारतरत्न प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, गोंदिया (रजि.)
- नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन गोंदिया (रजि.)
- मुस्लिम मायनारीटी ट्रस्ट, गोंदिया
- ओ.बी.सी. संघर्ष कृती समिती गोंदिया
- संघर्ष वाहीनी (विमूक्त भटके परिषद) गोंदिया
- युवा सुदर्शन बहुउद्देशिय संस्था, गोंदिया
- आर. टी. फाऊंडेशन, गोंदिया
- राष्ट्रीय चर्मकार महासंघ, गोंदिया
- भारतीय बौध्द महासभा, गोंदिया
- लहुजी साळवे मातंग समाज संस्था, गोंदिया
- समता सैनिक दल, गोंदिया

सौजन्य–बेरार टाईम्स

ओबीसी अधिकार मंच, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ, मराठा सेवा संघ, राष्ट्रीय ओबीसी अधिकारी कर्मचारी महासंघ संविधान मैत्री संघ, महात्मा फुले समता परिषद, भारतीय पिछडा शोषित संघटना, ओबीसी जनमोर्चा, संभाजी ब्रिगेड, युवा बहुजन मंच संथागार सेवा समिती, आदिवासी समाज संघटन, भारतीय विद्यार्थी संघठन, प्राथमिक शिक्षक संघ, प्राथमिक शिक्षक समिती, पुरोगामी शिक्षक संघटना, शिक्षक सहकार संघटना व सर्व ओबीसी प्रवर्गातील जाती संघटना, बहुजन संघटना


## ओबीसींचे वसतिगृह २२ ऑगस्ट पर्यंत सुरु करा अन्यथा,ओबीसी संघटना करणार आंदोलन



**गोंदिया–**ओबीसी, भटक्या विमुक्त समुहातील विद्यार्थी व विद्यार्थीनीकरीता गेल्या ७ वर्षापासून वसतिगृह मंजूर करण्यात आले.तसेच प्रत्येक शैक्षणिक सत्राच्यावेळी वसतिगृह सुरु होतील असे आश्व–ासन राज्यसरकारच्यावतीने देण्यात यायचे.मात्र पुर्व विदर्भातील भंडारा, गडचिरोली,चंद्रपूर व नागपूर येथील वसतिगृह सुरु झाले असून गोंदिया येथील वसतिगृह सुरु करण्यात आलेले नाही.ते वसतिगृह २२ऑगस्ट २०२४ पर्यंत सुरु न केल्यास ओबीसी संघटना आंदोलनाचा मार्ग पत्करुन वसतिगृहात विद्यार्थी विद्यार्थीनीसह प्रवेश करतील असा इशारा निवेदनातून इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक विनोद मोहतुरे यांना दिला आहे.

मागील ७ वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाने ओबीसी मुला–मुलींसाठी महाराष्ट्र राज्यात वस्तीगृह सुरू होतील अशी घोषणा केली होती. मागील दोन वर्षात ओबीसी संघटनांच्या रेट्यामुळे वसतिगृह सुरू करण्यासाठी शासनाने प्रक्रिया सुरू केली. मागील सत्रात २८ मार्च २०२४ रोजी पासून वस्तीगृह सुरू होतील अशा प्रकारचं वेळापत्रक सुद्धा शासनाने दिले होते.

परंतु आज पर्यंत गोंदिया जिल्ह्यातील मुला मुलींचे वसतिगृह सुरू झालेले नाहीत. आपल्या जिल्ह्याच्या जवळच भंडारा नागपूर गडचिरोली चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये वस्तीगृह सुरू झालेले आहेत म्हणून आपण सुद्धा तत्काळ २२ ऑगस्ट २०२४ पर्यंत इतर वसतिगृह सुरू करावे अन्यथा ओबीसी संघटनांना आंदोलन करावे लागेल यास सर्वस्वी इतर मागास बहुजन कल्याण विभाग जबाबदार असेल निवेदनात म्हटले आहे.

निवेदन देतेवेळी ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे,कैलास भेलावे,नरेश परिहार,ओबीसी संघर्ष कृती समितीचे इंजि.राजीव ठकरेले,भारतीय पिछडा शोषित संघटनेचे प्रेम साठवणे,भागचंद रहागंडाले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

साप्ताहिक
बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.२१ ऑगस्ट २०२४ 

## संपादकीय

# महाराष्ट्र का पेटवल्या जातो?

भारतीय संघ राज्यांमध्ये सुरुवातीपासूनच महाराष्ट्र राज्य सर्वच क्षेत्रात प्रगतशील व शांतता सुव्यवस्था सुरक्षितता प्रिय राज्य मानले जाते. भारतीय संविधानाचा आधार असलेली शिव फुले सयाजी शाहू आंबेडकर गाडगेबाबा तुकडोजी पंजाबराव अण्णाभाऊ प्रबोधनकार ही विचारधारा इथेच जन्माला आली. पोसली. तसेच घरोघरी पोचली. समाजातील सर्व घटकांनी स्वीकारली . आत्मसात केली. परंतू दुर्दैवाने गेली काही वर्षे आर एस एस व भाजप क्रुरपणे महाराष्ट्रातील सौख्य कायमस्वरूपी बिघडवण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी कार्यरत आहे. त्यासाठी किरकोळ कारणावरून महाराष्ट्रात धार्मिक जातीय दंगली घडवून आणल्या जात आहेत. यामागची ऐतिहासिक कारणमीमांसा करताना या बाबी स्पष्ट होतात. वाचकांनी विचार करून योग्य निर्णय घ्यावा ही विनंती आहे .

मुळातच महाराष्ट्रावर अठराव्या शतकात पेशवाईचे प्राबल्य निर्माण करण्यात तत्कालीन ब्राह्मणी शक्ती यशस्वी झाल्या होत्या. छत्रपती निष्क्रिय व नामधारी झाले होते. या परिस्थितीत भारतातील प्लासीच्या लढाईत इंग्रजांना यश मिळाले आणि व्यापारी इंग्रज बंगाल प्रांताचे राज्यकर्ते झाले. नंतर बक्सरच्या लढाईतील यशाने इंग्रजी सत्तेला बळ मिळाले. तर त्याचवेळी भारतीय ब्राह्मणी शक्तीने इंग्रजांना आपले भाऊ मानले. मोगलशाही हारली व इंग्रज सत्तेवर आले हा आनंद साजरा करण्यासाठी बंगाली साहित्यिक बकीमचंद्र चटोपाध्याय यांनी आनंदमठ कादंबरी लिहिली. त्यात वंदे मातरम गित घातले.

एकीकडे मराठेशाही खिळखिळी झाली व १८१८ जून मध्ये चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण चिंत्या नातूने शनिवारवाड्यावरील फडकणारा भगवा खाली उतरवून युनियन जॅक तेथे फडकवला. छत्रपती व पेशवे इंग्रजांचे गुलाम पाहूणे झाले... पुढे १९४७ पर्यंत ब्राह्मणांनी इंग्रजांच्या काळात नोकरशहा बनून सत्तेचा मलिदा खाल्ला. परंतू अनेक प्रकारचे प्रयत्न करुनही इंग्रजांनी ब्राह्मणांना राजसत्तेच्या पायरीवर देखील येऊ दिले नाही..? तरीही इंग्रजी सत्ता रहावी असे मानणारा मोठा उच्च शिक्षित ब्राह्मण समाज होता. याच धामधुमीत ब्राह्मणांनी आर एस एस ची स्थापना १९२५ मध्ये केली. त्या दिवसापासून त्यांना महाराष्ट्रावर एकसुत्री आर एस एस ची रामदासी राजसत्ता प्रस्थापित करायची एकमेव तिव्र अभिलाषा आहे.

इंग्रजांनी पेशव्यांकडून राज्य ताब्यात घेतले होते. ते इंग्रजांनी ब्राह्मणांनाच परत देणे व मनुस्मृती नुसार नव पेशवाईने राज्यकारभार करणे हीच ब्राह्मणी पाशवी इच्छा आहे. त्यामुळेच त्यांना भारतातील महाराष्ट्र वगळता अन्य सर्वच राज्ये व केंद्रशासित प्रदेशात एकहाती सत्ता व भारतात केंद्रीय सत्ता ताब्यात असली तरी समाधान नाही. एकच लक्ष्य, महाराष्ट्रात पेशवाई लादणे ... आणि हे यश मिळत नाही तोपर्यंत या मावळ्यांच्या अवर्णनीय कर्तृत्वाने निर्माण झालेल्या स्वराज्याचे जमेल तसे लचके तोडून महाराष्ट्र राज्य कंगाल करणे हे ब्राह्मणी कारस्थान सुरू आहे.

महाराष्ट्रात आर एस एस चे मुख्यालय आहे, जागतिक किर्तीचे ब्राह्मणवादी रामदासी विचारवंत आहेत, देशाच्या राष्ट्रपती पदावर ते प्रधानमंत्री, तिन्ही सेनाप्रमुख, सर्व नोकरशाही, सर्व उद्योजक, बैंकर्स, कुलपती कुलगुरू, सांस्कृतिक धार्मिक आध्यात्मिक शैक्षणिक संस्था आर एस एस च्या ताब्यात आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळा बंद केल्या आहेत. प्रत्येकाच्या मनात व हृदयात आर एस एस चे नाव व विचार पोचवले आहेत. तरीही महाराष्ट्रातील फाटका तुटका बहुजन समाज शिव फुले सयाजी शाहू आंबेडकर गाडगेबाबा तुकडोजी पंजाबराव अण्णाभाऊ प्रबोधनकार यांच्या विचारांचा वारसा सोडायला तयार नाही. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन दोन तुकडे केले, कॉग्रेसच्या नेत्यांना भाजपवासी केले तरी लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला दारुण पराभव पाहावा लागला. खरे तर महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे चाळीस तर महायुतीचे आठ उमेदवार निवडून येणे अपेक्षित होते. परंतू भाजपला पोषक ठरणारा घोळ झाला.

महाविकास आघाडीचे उमेदवार शंभर टक्के यशाची खात्री करून निवडले जातील. तिन्ही पक्षांचे एकमत झाले तरच उमेदवार नाव ठरवू. अशा चर्चा झाल्या. पण दुर्दैवाने तसे झाले नाही. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी बहुजनवादी पुरोगामी चळवळींचे कार्य व विचार भारतीय राज्यातील गावोगावी पोहचलेले आहेत. २००४।२००९ मधील सार्वजनिक निवडणुकीत संभाजी ब्रिगेडची भंडारकर संस्था विरोधात केलेली कारवाई महाराष्ट्रात व देशात युपीए सरकार आणण्यासाठी उपयोगी ठरली होती. २०२४ मध्ये हीच पुनरावृत्ती झाली आहे. गेले अनेक वर्षे शेकडो पुरोगामी चळवळी रात्रंदिवस महाराष्ट्रातील समतावादी मानवतावादी संविधान आचरणातून प्रदर्शित करणारी जनता निर्माण करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. या व अन्य कारणांमुळे आर एस एस चे प्रमुख नेते व कर्मठ ब्राह्मण अस्वस्थ झाले आहेत. सामाजिक चळवळीतील संभाजी ब्रिगेड व अन्य निवडक संघटना जनजागृती करत आहे. विविध धर्म जाती जमातीचे लोक सर्वच मतभेद विसरून एकत्र आले आहेत. तर राजकीय पक्षांचे शरदराव पवार, राहूल गांधी व उध्दव ठाकरे असे नेते जोपर्यंत आहेत तोपर्यंत महाराष्ट्रात आर एस एस चे एकहाती ब्राह्मणी सरकार स्थापन करणे अशक्य आहे, याची जाणीव आर एस एस व भाजपच्या नेत्यांना झाली आहे . त्यातही शरदराव पवार, उध्दव ठाकरे व संभाजी ब्रिगेड जास्त खतरनाक आहेत ... याशिवाय सध्याच्या वातावरणात महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत नोव्हेंबर २०२४ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार पूर्ण बहुमताने निवडून येणार आहे. हा मोठा धसका घेतला आहे...

मध्ययुगीन काळात किल्ले जिंकून घेणे गरजेचे होते. मराठ्यांच्या शत्रुंना प्रयत्न करुनही अनेकदा किल्ले जिंकून घेणे जमत नव्हते. अशा वेळी शत्रू वेगवेगळ्या प्रकारच्या विध्वंसक आयुधांचा वापर करून मराठ्यांच्या किल्ल्यांचे अतोनात नुकसान करत होते ...

वर्तमानातील शत्रू लोकशाहीचा अडथळा असल्याने महाराष्ट्रातील सामाजिक सांस्कृतिक धार्मिक विधी आर्थिक शैक्षणिक राजकीय वातावरणात द्वेषमूलक भावनांची वादळे निर्माण करत असताना दिसतात . त्यातल्या त्यात २०१९ पासून देवेंद्र फडणवीसांच्या तोंडातील घास अनेकदा न गिळताच ओकावा लागला. तर मी पुन्हा येईल म्हणत मुख्यमंत्री पदाची संधी गेली. गुडघ्याच्या बाशिंगाला सांभाळत आहेत. तर २०२४ विधानसभा निवडणुका जवळ आल्या आहेत. त्यातही पराभव स्पष्ट दिसत आहे.. याच कारणाने व सत्तेसाठी प्रचंड आसुसलेल्या विकृत भावनेने आर एस एस व भाजपने इतरांना ब्लॅक मेल करत महाराष्ट्रातील विकासाची पाच वर्षे गमावलेली आहेत... आणि आता केंद्रातील सत्ता गेल्या मुळे त्यांची चिड चिड प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली आहे . या पार्श्वभूमीवर आर एस एस व भाजप महाराष्ट्रातील महानगर नगर शहर गाव खेडे वाडा वाडी पाडा तांडा वस्ती अशा सर्वच ठिकाणी धार्मिक जातीय जमातीय भाषिक लिंग या क्षेत्रात दंगली घडवून आणण्यासाठी आकाशपाताळ एक करु शकतात असे अनेक गुप्तचर यंत्रणा, पोलीस यंत्रणा, संस्था, राजकीय नेते व अभ्यासक बोलत असतात ...

महाराष्ट्रात एकहाती ब्राह्मणी सत्ता स्थापन होईपर्यंत महाराष्ट्राला बरेच काही गमवावे लागणार आहे ... तेव्हा पुरोगामी चळवळीतील मित्र मैत्रिणींनो, बंधू भगिनींनो सावध राहा . रात्र वैऱ्याची आहे .

**पुरुषोत्तम खेडेकर** चिखली.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# "मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण" योजनेचा जिल्हास्तरीय भव्य शुभारंभ

**गोंदिया:–** राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी तसेच कुटूंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी राज्यात "मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण योजना' सुरु करण्यात आली. या योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ पुणे येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला असून जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात या योजनेचा जिल्हास्तरीय भव्य शुभारंभ जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बालकल्याण) संजय गणवीर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे, रमेश ताराम यांच्यासह लाभार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी लाभार्थी लाडक्या बहिणी उत्स्फूर्तपणे उपस्थित होत्या. लाडकी बहीण योजना अडीअडचणीच्या कामी आली अशी त्यांची भावना होती. खात्यात पैसे जमा झाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. रक्षाबंधन पूर्वीच ओवाळणी मिळाली अश्या त्यांच्या प्रतिक्रिया आहेत. ही योजना कधीही बंद होणार नसून भविष्यात या रकमेत वाढ केली जाईल असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी जिल्ह्यातील २ लाख ८८ हजार बहिणींचे अर्ज पात्र ठरले होते, यापैकी २ लाख ८५ हजार बहिणींच्या खात्यावर बुधवारपासून पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील अनेक लाभार्थी बहिणींच्या बँक खात्यावर पैसे जमा झाल्यानंतर त्यांच्या चेह?यावर आनंदाचे भाव झळकत आहे. या योजनेला जिल्ह्यात महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे, त्यांच्यात आनंदाचे वातारण निर्माण होत आहे. या योजनेत २१ ते ६५ वर्ष वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये आर्थिक लाभ मिळणार आहे. माता–भगीनींसाठी ही योजना चांगलीच लाभाची ठरत असून सदर योजना सुरुच राहणार आहे.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत माझ्या बँक खात्यात दोन महिन्याचे तीन हजार रुपये जमा झाले, याचा खूप आनंद झाला. खरं तर भाऊ रक्षाबंधनाच्या दिवशी ओवाळणी देतो. मात्र मुख्यमंत्र्यांनी राखी बांधण्यापूर्वीच बहिणीला ओवाळणी दिली, त्यामुळे आम्हा बहिणींना खूप आनंद झाला असून या योजनेसाठी मुख्यमंत्री व शासनाला खूप खूप धन्यवाद.**

**–ज्योती यशपाल डोंगरे, गोंदिया**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत माझ्या बँक खात्यात १४ ऑगस्टला तीन हजार रुपये जमा झाले. ही खूप आनंदाची बाब असून शासनाने आम्हाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू केलेली ही योजना महिलांना आत्मनिर्भर करणारीच आहे. यासाठी आम्ही शासनाचे आभारी आहोत.–**

**दुर्गा सेलोकार, गोंदिया**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत दोन महिन्यांचे तीन हजार रुपये मला मिळाले आहेत. माझी आर्थिक स्थिती बेताची असल्याने मुलीची फ्री भरायची अडचण होती. अशातच योजनेचा लाभ मिळाल्याने ही अडचण आता दूर झाली आहे. या मदतीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सरकारचे खूप खूप आभार.**

**–तृप्ती अनिल डोंगरे, बलमाटोला, गोंदिया**

# जल जंगल आणि जमीन टिकवून ठेवण्याचे सगळे श्रेय आदिवासी समाजाला : माजी मंत्री राजकुमार बडोले

**सडक अर्जुनी :–** क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांनी कमी वयातच देशविरोधी शक्तींपुढे न झुकता, इंग्रजांसोबत कसल्याही प्रकारची संधी न करता इंग्रजाना सळो की पळो करून सोडले होते. आज देशाच्या राष्ट्रपती पदावर एक आदिवासी महिला आहे याचा सार्थ अभिमान असून नागरिकांनी आदिवासी समाजासाठी सुरू असलेल्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी केले आहे.



९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिवस समस्त जगाने साजरा केला. त्या निमित्त राष्ट्र घडविणाऱ्या आदिवासी समाजातील विविध प्रमुख व्यक्तींचा सत्कार समारंभ जागतिक आदिवासी दिवस सप्ताह कार्यक्रमाच्या निमित्ताने आशीर्वाद सभागृह लॉन सडक अर्जुनी येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी जल जंगल आणि जमीन टिकवून ठेवण्याचे सगळे श्रेय आदिवासी समाजाला जात असल्याचे मत व्यक्त केले.

आदिवासी समाज हा अनेक वर्षांपासून जंगलात राहत असून सर्व सोयी सुविधा शहरात असतांना सुद्धा त्यांनी पर्यावरण संवर्धन करण्यासाठी जंगलातच राहणे पसंत केले. त्यांच्या या त्यागामुळे आज निसर्ग टिकून आहे. आज आदिवासी समाजातील व्यक्ती देशाच्या राष्ट्रपती पदी विराजमान आहे हे फक्त भारतीय जनता पक्ष करू शकते. या आधी सुद्धा राष्ट्रपती पदी एका मुस्लिम वैज्ञानिकाला भाजप ने संधी दिली. त्यानंतर एका दलित व्यक्तीला देशाच्या राष्ट्रपती पदी विराजमान केले आणि आज एक आदिवासी महिला देशाच्या राष्ट्रपती पदी विराजमान आहे, हे या आदिवासी समाजासाठी गौरवाची बाब असली पाहिजे.

शासनाने अनेक योजना आदिवासी समाजासाठी राबविल्या आहेत. त्यांचा पुरेपूर लाभ आदिवासी समाजाने घेतला पाहिजे सोबतच प्रत्येक कार्यकर्त्याने आदिवासी समाजासाठी त्यांचे प्रश्न त्यांच्या समस्या सोडविणीसाठी शर्थीचे प्रयत्न करण्याचे आवाहन राज्याचे माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी केले.

सत्कार समारंभाचा उद्घाटन सोहळा भाजप आदिवासी आघाडी प्रदेश महासचिव तसेच गोंडवाना विद्यापीठाची सिनेट सदस्य डॉ. प्रकाश गेडाम यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री राजकुमारजी बडोले तर सहउद्घाटक म्हणून माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी होते. यावेळी भाजप आदिवासी आघाडीचे जिल्हाअध्यक्ष हनवंत वट्टी, भरत मडावी, लक्ष्मीकांत धनगाये, डॉ. लक्ष्मण भगत, संगीताताई खोब्रागडे, प्रीतीताई कतलाम, भुमेश्वर पटले, चन्द्रकलाताई डोंगरवार, विश्वनाथ रहांगडाले, अशोक लंजे, चेतन वळगाये, सपनाताई नाईक, रमेश पंधरे, शशीकलाताई ताराम, दीपालीताई मेश्राम, गिरीधर हत्तीमारे, ओंकार टेंभुर्णे, रंजनाताई भोई, प्रतिभाताई भेंडारकर, तुकाराम राणे, प्रल्हाद वरठे, खेमराज भेंडारकर, तुलाराम येरणे, शिशिर येळे, सुभाष कुळमेथे, ललित डोंगरवार, देविदास कोवे तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# जर्मन भाषा शिकण्याची व शिकवण्याची गोंदिया जिल्ह्यातील शिक्षकांना सुवर्णसंधी

## जास्तीतजास्त शिक्षकांनी लाभ घ्यावा– डॉ. नरेश वैद्य, प्राचार्य डायट गोंदिया



**गोंदिया:–** जर्मनीला नोकरी व रोजगारानिमित्त जाणाऱ्या कुशल मनुष्यबळाला जर्मन भाषा शिकवण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत आयोजित जर्मन भाषा प्रशिक्षण वर्गास, जर्मन भाषा शिकण्याची आवड असणाऱ्या शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (जि. प./ न. प) शाळातील इच्छुक शिक्षकांना नाव नोंदणी करण्याचे आवाहन राज्य शासनाने केले आहे. त्याच अनुषंगाने गोंदिया जिल्ह्यातील जास्तीतजास्त शिक्षकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन आज घेतलेल्या पत्र परिषदेत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) गोंदियाचे प्राचार्य डॉ. नरेश वैद्य यांनी केले आहे.

सविस्तर असे की, महाराष्ट्र राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेले कुशल मनुष्यबळ आणि अन्य प्रगत युरोपियन देशांमध्ये त्यांची असणारी कमतरता या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील युवकांना युरोपियन देशांमध्ये नोकरी व रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत, ही बाब विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने जर्मन देशातील बाडेन बुटेनबर्ग या राज्याशी कुशल मनुष्यबळ प्रशिक्षित करून उपलब्ध करून देणे याबाबत सामंजस्य करार दिनांक २५/२/२०२४ रोजी केला आहे. तसेच पुढील कामकाजाची दिशा ठरविण्यासाठी दि. ११ जुलै, २०२४ शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या अनुषंगाने जर्मन भाषा शिकविण्यासाठी ग्वोथे इन्स्टिट्यूट, मॅक्सम्युलर भवन, पुणे व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मध्ये दिनांक ०९/०८/२०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

जर्मन भाषा शिकविण्यासाठी जिल्हास्तरावर २५ वि?द्यार्थ्यांसाठी एक प्रशिक्षण वर्ग याप्रमाणे राज्यात १०,००० विद्यार्थ्यांसाठी ४०० प्रशिक्षण वर्गाची आवश्यकता आहे. सदर प्रशिक्षण वर्ग दोन सत्रात असल्याने (सकाळ व संध्याकाळ) असे २०० प्रशिक्षण वर्ग राज्यात सुरु करणे प्रस्तावित आहे. या प्रशिक्षण वर्गासाठी जर्मन भाषेची अर्हता BA in जर्मन/ चअ ळप जर्मन व ग्योथे इन्स्टिट्यूट यांचे द्वारे घेण्यात येणारी स्तरनिहाय अ१, अ२, इ१, इ२, उ१, उ२ उत्तीर्ण असणाऱ्या शिक्षकांची संख्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही त्यामुळे शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील नियमित शिक्षकांसाठी जर्मन भाषेचे प्रशिक्षण वर्ग शासनामार्फत मोफत सुरु करणे प्रस्तावित असून शिक्षकांची नावनोंदणी करण्यासाठी (https://forms.qle/1Q32ByNwp9MnH$mH$c7) ही गुगल लिंक तयार करण्यात आली आहे.

उपरोक्त लिंक वर शिक्षक नावनोंदणी करीत आहेत तथापि जर्मन भाषा शिकविण्यासाठी मोठ्या संख्येने शिक्षकांची आवश्यकता असल्याने व्यापक लोकहितास्तव गोंदिया जिल्हा कार्यक्षेत्रातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील जर्मन भाषा शिकण्याची आवड असणाऱ्या इच्छुक शिक्षकांना उपरोक्त लिंक वर आपली नाव नोंदणी करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

तरी गोंदिया जिल्ह्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेमधील (जि. प./ न.प) अधिकाधिक शिक्षकांनी (https: //forms.qle/1Q32B yNwp 9MnH$mH$c७) या लिंकवर आपली नावनोंदणी करावी. तसेच दि. ११ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार जर्मनी देशात नोकरीसाठी इच्छुक असणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील पात्र व कुशल युवकांनी https://maa.ac.in/ Germany Em{loyment/ या वेबसाईटवर आपली नाव नोंदणी करावी असेही प्राचार्य डॉ. नरेश वैद्य यांनी आवाहन केले आहे.

# गोरेगाव तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेत नवप्रतिभा हाय.दवडीपार प्रथम



**गोरेगाव:–** गोरेगाव तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२४ २५ स्पर्धेचे आयोजन श.जा.ति. जि. प. हायस्कूल गोरेगाव येथे १६ ऑगस्टला करण्यात आले. या नाट्योत्सवाचे उद्घाटन शिक्षण विस्तार अधिकारी डी.टी.कावळे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण विस्तार अधिकारी एच.एम.बोपचे आणि गटसाधन केंद्र गोरेगाव चे सर्व विषय साधन व्यक्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.शिक्षण विस्तार अधिकारी डी.टी. कावळे यांनी अध्यक्षीय भाषणात विज्ञान नाट्योत्सवाचे महत्व स्पष्ट करीत विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी अशा अनेक माध्यमातून निर्माण केल्यास त्यांच्या मनातील भिती दूर होईल असे सांगितले.यावेळी उपस्थित मान्यवरांनीहीं समयोचित मार्गदर्शन केले.

नाट्य उत्सवात तालुक्यातील विविध शाळांतील एकूण २३ स्पर्धक चमुंनी सहभाग घेतला. सदर स्पर्धक चमुंनी दृक श्राव्य माध्यमांच्या सहाय्याने दिलेल्या विषयावर आधारित विज्ञान नाट्याचे सादरीकरण केले. परीक्षक म्हणून व्याख्याता कु.ए. ए. गोतमारे, आर.वाय.गजभिये व एन डी.राठोड यांनी कामगिरी पार पाडली.नाट्योत्सवाच्या निकालानुसार नवप्रतिभा हायस्कूल दवडीपारच्या चमूने प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय व तृतीय क्रमांकावर अनुक्रमे एम.सी.पी.कॉन्व्हेंट गोरेगाव चमू व श.जा.ति. जि.प. हायस्कूल गोरेगावच्या चमूची निवड झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श.जा.ति.जि.प.हाय. गोरेगाव येथील कर्मचारीवृंद तसेच गटसाधन केंद्र गोरेगाव येथील सर्व विषय साधनव्यक्ती व इतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.प्रास्ताविक विषय साधनव्यक्ती भास्कर बाहेकर यांनी केले. संचालन विषय साधनव्यक्ती ओमप्रकाश ठाकरे यांनी तर आभार विषय साधनव्यक्ती सुनिल ठाकुर यांनी मानले.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी ३० सप्टेंबर पर्यत जलल विद्यार्थ्याकडून अर्ज आमंत्रित

**भंडारा :–** सन २०२४–२५ या सत्रापासून ज्ञानज्योती सावित्रीबाई फ्फुले आधार योजना राबविण्यास दिनांक १३ डिसेबर,२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.सदर योजनेसाठी दिनांक ११ मार्च,२०२४ च्या शासन निर्णयान्वये ज्ञानज्योती सावित्रीबाई फ्फुले आधार योजना कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

तसेच इतर मागास वर्ग,विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष प्रवर्गातील १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याकरिता मान्यता प्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रभूत प्रवेश प्रक्रियाद्वारे प्रवेश घेतलेल्या परंतू शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या सन २०२४–२५ या सत्रापासुन ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना या योजनेसाठी अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे.

तरी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी उच्च शिक्षणाचे द्वितीय,तृतीय,चतुर्थ वर्षामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिनांक ३० संप्टेबर,२०२४ पर्यत व प्रथम वर्षामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिनांक १५ ऑक्टोबर,२०२४ पर्यत परीपुर्ण भरुन अर्ज सहाय्यक संचालक,इतर मागास,बहुजन कल्याण कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,सिव्हिल लाईन,जिल्हा परिषद चौक,भंडारा या कार्यालयात अर्ज सादर करावे.असे आवाहन इतर मागास,बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक,बाबासाहेब देशमुख यांनी कळविले आहे.

# तिरोड्यात २१ तारखेला कडकडीत बंद पाडणार

**तिरोडा:–** येत्या २१ ऑगस्ट रोजी भारत बंद पुकारण्यात आलेला आहे. तिरोडा तालुक्यात कडकडीत बंद पाळला जाणार असून बंदला नागरीकांनी सहकार्य करण्याचे आवाहन एससी, एसटी, ओबीसी आरक्षण बचाओ समितीने केले आहे. महाप्रज्ञा बुध्द विहारातील अभ्यासकेंद्रात (ता.१८) पत्र परिषद आयोजित करण्यात आली. पत्र परिषदेला एससी, एसटी, ओबीसी आरक्षण बचाओ समिती संयोजक तथा महाप्रज्ञा बुध्द विहार समितीचे अध्यक्ष अतुल गजभिये यांनी संबोधीत केले. यावेळी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक विजय बन्सोड, नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा वाल्मिकी संघटनेचे संरक्षक राजेश गुनेरीया, खटीक समाज संघटनेचे नितीन लारोकर, चर्मकार संघटनेचे शामराव भोंडेकर, आदिवासी संघटनेचे टी.एम. मडावी, बिरसा फ्रायटरचे भोजराज उईके, जामा मस्जिद तिरोडाचे सदर हाजी अब्दुल सलाम शेख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे संचालक सुरेश बन्सोड, महाप्रज्ञा बुध्द विहार समितीचे कोषाध्यक्ष आर. बी. नंदागवळी, मनोज गेडाम, सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे विनोद तागडे, भारतीय बौध्द महासभेचे जिल्हा संयोजक देवानंद शहारे, संविधान मैत्री संघाचे ॲड. नरेश शेंडे, किरण वैद्य, गजानन नंदागवळी, युवा कार्यकर्ते साजन रामटेके, लोकेश जनबंधू यावेळी उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती, जमातींच्या आरक्षणात क्रिमिलेअर प्रस्तावित केले आहे. शिवाय या दोन्ही प्रवर्गामध्ये उपवर्ग निर्माण करण्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे अनुसूचित जातींचे आरक्षण जवळपास संपुष्टात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या विरोधात केंद्र शासनाने अध्यादेश काढून तथा त्यावर कायदा करून हा निर्णय रद्दबातल करावा, ही मुख्य मागणी आंदोलनातून करण्यात येत आहे. याशिवाय अनुसूचित जाती, जमातींचे आरक्षण संविधानाच्या नवव्या अनुसूचीमध्ये समाविष्ठ करावे, जातनिहाय जनगणना करून जातनिहाय सर्वांना लोकसंख्येच्या प्रमाणात शंभर टक्के आरक्षण द्यावे, खासगी आस्थापनांमध्ये एससी, एसटी, ओबीसी प्रवर्गाला आरक्षण लागू करावे, उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांची नियुक्ती न्यायिक नियुक्ती आयोग गठीत करून परिक्षा घेवून करावी, शासकीय नोकरीमधील अनुशेष त्वरीत भरण्यात यावा, ओबीसी प्रवर्गातील क्रिमिलेअरची अट रद करावी, ओबीसी जनगणना करावी, या मागण्या आंदोलनातून शासनाला करण्यात येणार असल्याचे पत्र परिषदेतून सांगण्यात आले आहे.



**दहा हजार पेक्षा अधिक लोक येणार**

तिरोडा तालुक्यात अनुसूचीत जाती, जमातीच्या प्रवर्गातील सर्वच समाज आंदोलनाला जुडले आहेत. ओबीसी समाजबांधवांना सुध्दा आंदोलनाला जोडण्यात येत आहे. तालुक्यातील जवळपास सर्वच गावांत बैठका घेवून निर्णयाच्या विरोधात लोकांना संघटीत करण्यात येत आहे. त्यामुळे जाहिर सभा आणि मोर्चात तालुक्यातील विविध गावांतील दहा हजार पेक्षा अधिक लोकांच्या उपस्थितीची शक्यता आहे. आंदोलकांच्या पार्किंगची व्यवस्था जिल्हा परिषद कन्या शाळेच्या प्रांगणात करण्यात आली आहे. शहरात कडकडीत बंद पाडण्यासाठी व्यापारी संघटनेची बैठक घेण्यात आली आहे, शिवाय नागरीकांची गैरसोय होवू नये म्हणून त्यांच्यापर्यंत बंदची माहीती पोचविण्यात आलेली आहे. दरम्यान सर्वच व्यवसायिकांनी बंद शांततेत पार पडण्यासाठी सहकार्याचे आवाहन करण्यात आले आहे

**असे राहणार आंदोलन**

तिरोडा शहरातील जुने नगर परिषद कार्यालयासमोर सकाळी १०:३० वाजता तालुक्यातील नागरीक जमा होणार आहेत. याठिकाणातून शहरात भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चा मोहनलाल चौक, जुनी वस्ती, तुकडोजी पुतळा, जनपत शाळा, कहार मोहल्ला, नगर परिषद यगीचा, स्नेहल टॉकीज ते मार्केट मार्गे जुने नगर परिषद कार्यालयाजवळ पोचणार आहे. याठिकाणी जाहीर सभा होणार आहे. दरम्यान प्रशासनाला निवेदन देवून आंदोलन संपविले जाणार आहे.

**आंदोलन हे साधनच**

लॅटरल पध्दतीने सन २०१८ पासून भारत सरकारने सचिव दर्जाचे व्यक्तींची भरती केली आहे. यात एकही अनुसूचीत जाती, जमाती आणि ओबीसी प्रवर्गातील व्यक्तींना स्थान देण्यात आले आहे. शासनाने अनुसूचीत जाती, जमातींचा सामाजिक, शैक्षणिक आर्थिक विकास साधला नाही. मात्र, येळोवेळी आरक्षणाबद्दल गैरसमज पसरवून समाजात सेक निर्माण करण्यात येत आहे. सध्याचे भारत बंद हे साधन आहे. यापुढे अनुसूचित जाती, जमाती आमदार, खासदार यांचा घेराव तथा गरज पडल्यास पुढे सुध्दा भारत बंद करण्यात येणार असल्याचे एससी, एसटी, ओबीसी आरक्षण बचाओ समितीचे संयोजक अतुल गजभिये यांनी पत्र परिषदेत सांगितले.

**कर्मचार्यांनी घ्यावी सुट्टी**

भारत बंदचे आंदोलन हे अस्तित्वाची लढाई आहे. या आंदोलनात सर्वचस्तरातील लोकं सहभागी होणार आहेत. त्यामुळे एससी, एसटी ओबीसी प्रवर्गातील अधिकारी, कर्मचारी यांनी सुट्टी घेऊन आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# आरोग्य शिबिरातून गोरगरीब रुग्णांची सेवा करण्याची संधी-माजी मंत्री राजकुमार बडोले




**अर्जुनी मोरगाव:-** आपला परिसर हा अति संवेदनशील, मात्र पालकमंत्री म्हणून आपल्या हातून अनेक चांगल्या गोष्टी करण्याचा प्रयत्न झाला. त्यातून बऱ्याच सुविधा तालुक्यात उपलब्धही झाले आहेत. पण आरोग्य सुविधेसाठी परिसरातील रुग्णांना पुढील उपचारासाठी बाहेर पडावे लागते. आपण बघतो की, ब्रम्हपुरी गोंदिया नागपूर हे मेडिकल हब तयार झाले आहेत. त्यातील अनेक ठिकाणी गोर गरिबांना लुटण्याचा प्रयत्न होत आहे. अनेकांना आपल्याला आरोग्य योजनांबाबत कल्पना नसते. बऱ्याच शस्त्रक्रिया उपचार हे मोफत तर अतिशय कमी पैशात होतात मात्र त्यावेळी आपल्या अज्ञाना अभावी लूट होत असते. त्यामुळे गोर गरीब व सर्व सामान्य रुग्णांना आरोग्य विषय सल्ला मदत व गरजू रुग्णांना मदतीचा हात देत रुग्णांची सेवा ही ईश्वर सेवा समजून गंगा बाई मल्टिस्पेशीयलीटी हॉस्पीटल व आशा हॉस्पीटल व फाउंडेशनच्या मदतीने आपण रुग्ण आणि शासन यांच्यातील दुवा म्हणून यापुढे आपण काम करू,आणी अशा निशुःल्क आरोग्य शिबीरातुन गोरगरीब रुग्णांची सेवा करण्याची संधी मला मिळाली. असे प्रतिपादन माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी केले.

राजकुमार बडोले फाऊंडेशन तर्फे ताडगाव, लाखांदूर रोडवर अर्जुनी मोर येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन ता.१६ रोजी सकाळी ९ ते १ या दरम्यान करण्यात आले होते. या आरोग्य शिबीरासाठी मेडीकल कॉलेज नागपूर, मेडीकल कॉलेज गोंदिया,आशा हॉस्पीटल नागपूर,आशा नर्सिंग कॉलेज कामठी,व महात्मा ज्योतिबा फ्फुले जन आरोग्य योजनाशी संबंधित नागपूर व गोंदिया येथील तज्ञ वैद्यकीय अधिकारी शिबिरात सहभागी झाले होते.

आयोजित शिबिराला जि.प.गटनेते लायकराम भेंडारकर, शारदा बडोले, डॉ. संजय गाडे, डॉ. देवेंद्र गनविर, तालुकाध्यक्ष विजय कापगते, प्रकाश गहाणे, रामदास कोहाडकर, मुकेश जायस्वाल, डॉ.गजानन डोंगरवार, डॉ.नाजूक कुंभरे, नगरसेवक राधेश्याम भेंडारकर, ममता भैय्या, सपना उपवंशी, रामचंद्र देशमुख,पं.स.सदस्य नूतन सोनवने, व्यंकट खोब्रागडे,पं.स.सदस्य शालिनी डोंगरवार, सरपंच मिना शहारे, इंदुबाई लांजेवार, संध्या शहारे, ईत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते. शिबीराचे आयोजन राजकुमार बडोले फाऊंडेशनचे राकेश भास्कर, प्रशांत शहारे, उमेश पंधरे, प्रशांत उके, अमीत हुमणे व भाजपचे ,भोजु लोगडे, येसकुमार शहारे, जितेंद्र साळवे, संतोष राठी, जयंत लांजेवार, संजय खरवडे,सुदाम कोवे, संजय बिस्वास ईत्यादींनी केले.शिबीराचे संचालन राजहंस ढोके व अमीत हुमने यांनी केले. व आभार प्रदर्शन लैलेश शिवनकर यांनी केले. या शिबिरात कॅन्सर, हृदयरोग, हड्डी रोग, कांन नाक घसा, बालरोग, स्त्रीरोग, दंतरोग, मानसिक रोग ई विविध आजारसंबंधी २०८७ रुग्णांची तपासणी करून निदान उपचार करून घेण्यात आले.

### आरोग्य विमा काढा

**ग्रामीण भागातील जनता अत्याधुनिक वैद्यकीय सेवेपासून वंचित आहे.तसेच ग्रामीण रुग्णांना खाजगी व महागड्या वैद्यकीय उपचारासाठी शहरात धाव घ्यावी लागते ९० टक्के आकस्मित दुर्घटना आपल्या आजूबाजूला घडतात. अशा दुर्घटना झाल्यास गबबड होते आरोग्य चांगले असेल तर संपूर्ण कुटुंब आनंदी असते. जीवन अमूल्य आहे. त्यामुळे सर्वांनी आरोग्य विमा काढणे आवश्यक आहे. आपल्याकडे बरेच लोक त्याबाबत उदासीन राहतात. ती गंभीर वेळ हाताळण्यासाठी जीवनात मदतीचा मूलभूत उपाय म्हणून आणि गरजू रुग्णांना आकस्मिक वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी आरोग्य विमा सर्वांनी घेण्याची गरज आहे. ते सर्वांनी काढण्याचे आवाहन राजकुमार बडोले यांनी केले.**

# भाजपाला धक्का! माजी खासदार शिशुपाल पटलेंचा काँग्रेसमध्ये प्रवेश



**भंडारा :** भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्राचे भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार शिशुपाल पटले हे काँग्रेस पक्षात प्रवेश करणार या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. पटले यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. पटले यांच्या काँग्रेस प्रवेशाने भाजपला मोठा धक्का बसणार असल्याचे बोलले जात आहे.

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात शिशुपाल पटले मानणारा मोठा वर्ग आहे. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे पूर्व विदर्भात काँग्रेस पक्ष संघटना अधिक मजबूत होणार आहे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज टिळक भवन येथे शिशुपाल पटले यांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले. यावेळी प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, तुमसरचे माजी आमदार अनिल बावनकर यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना शिशुपाल पटले म्हणाले की, आपण अनेक वर्ष भारतीय जनता पक्षात काम केले पण आता तो भाजपा राहिला नाही. तो आता तो आता व्यापारी आणि ठेकेदारांचा पक्ष झाला आहे. या पक्षाला शेतकरी सर्वसामान्य जनतेशी काही देणेघेणे राहिलेले नाही. ईडी सीबीआय यासारख्या संस्थांचा गैरवापर करून विरोधी पक्ष फोडण्याचे घृणास्पद प्रकार करून सत्ता मिळवण्याचा हव्यास आपल्यासारख्या कार्यकर्त्यांना आवडलेला नाही.

या देशातील आणि राज्यातील जनतेला न्याय देण्याचे आणि राज्याला पुढे घेऊन जाण्याचे काम काँग्रेस पक्षच करू शकतो, त्यामुळेच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आपण काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे असे शिशुपाल पटले म्हणाले.

# वर्धापनदिनी गुणवंत विद्यार्थांचा सत्कार



**गोरेगांव:-** येथील पी डी राहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गोरेगाव येथे ७८ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सत्र २०२३-२४ या सत्रातील ईयत्ता दहावी व बारावीत राज्य बोर्डाच्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थांचे सत्कार करण्यात आले.

विद्यार्थ्यांना ग्यानीरामभाऊ देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट गोरेगाव तर्फे पुरस्कार, निर्मल कॉम्प्युटर गोरेगाव, आयसेक्ट कॉम्प्युटर गोरेगाव व अनंदाबाई फगलाल बघेले स्मृतिपुरस्कार, स्व.देवाबाई पटले स्मृतिपुरस्कार, तसेच स्व. दादुरामजी राहांगडाले स्मृतिपुरस्कार देण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष ग्रामहिता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ टी पी येडे, उदघाटक.पी एफ बघेले माजी प्राचार्य, बक्षिस वितरक संचालक पटले साहेब होते. या कार्यक्रमाला सेवानिवृत केंद्र प्रमुख बी डी पटले, डी डी रहांगडाले, प्राचार्य सी डी मोरघडे , शिक्षक पालक संघाचे पदाधिकारी,माता पालक संघाचे पदाधिकारी,पालकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे संचालन ए एस बावनथडे व सी.आर.बिसेन यानी केले तर आभार एस.आर.मांढरे यांनी मानले.

गुणवंत विद्यार्थी- वर्ग १०वा- प्रथम अभय संजय कटरे, द्वितीय प्राची व्यंकटराव राहांगडाले, तृतीय अविराज भोजराज पटले, चतुर्थ राधिका रेखलाल राहांगडाले.

वर्ग १२ वी विज्ञान -प्रथम तृप्ती ओमप्रकाश बघेले, द्वितीय चेतना राहांगडाले, तृतीय खोमेश राठोड, चतुर्थ पृथ्वीराज पटले

वर्ग १२ वी कला- प्रथम अर्पिता जितेंद्र चौहान, द्वितीय ईशा श्रीराम तुरकर, तृतीय दिपक राजेश शर्मा, चतुर्थ नेहा प्रदिप सरोजकर. या सर्व प्राविण्य प्राप्त प्रज्ञावंत विद्यार्थीचे पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

### वयोश्री योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज जमा करा

**गोंदिया:** राज्यातील ६५ वर्ष किंवा त्याहून अधिक वय असलेल्या नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आधार लागतो. त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरीता तसेच मनःस्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्राद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी राज्यात ज्येष्ठांना वयोश्री योजनेचा आधार मिळणार आहे. योजनेचा अर्ज www.acswnagpur.in संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, गोंदिया येथे संपर्क करावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

### टेमनी जि.प.शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी नरेश परिहार यांची निवड

**गोंदियाः-** तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा टेमनी येथे १७ आँगस्टला झालेल्या शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठण पालक सभा सरपंच योगेश पटले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत गावातील सामाजिक कार्यकर्ते नरेश परिहार यांची शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी तर सौं वर्षा प्रवीण राऊत यांची उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.सोबतच इतर सदस्यांचीही निवड करण्यात आली.

या सभेला उपसरपंच शैलेंद्र डोंगरे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अशोक दमाहे,पोलीस पाटील प्रियंका नादने,माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेश आंबेडारे,शाळेचे मुख्याध्यापक श्री.उके,सहाय्यक शिक्षक नरेंद्र गौतम,श्री.कुंभरे,श्री रहागंडाले यांच्यासह पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस दलात निवड झालेल्या विद्यार्थांना प्रशस्तीपत्र देऊन केला गौरव



**गोंदिया:-** जिल्ह्याच्या अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील केशोरी पोलीस स्टेशनच्या (Police Station)वतीने आदीवासी बहुल व दुर्गम भागातील युवकांना पोलीस भरती मध्ये सहभागी होण्यासाठी सदर युवक-युवतींना स्पर्धा परिक्षा,भरतीपुर्व सराव तसेच योग्य मार्गदर्शन करण्यासाठी पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई नितीन डुंबरे यांनी सन २०१६ पासुन विद्यार्थांना धडे देण्यास सुरुवात केली.ते मागील ८ वर्षापासुन विद्यार्थांना निःशुल्क प्रशिक्षण (Free training) देत आहेत.त्यामुळे या भागातील युवक-युवतींना मोठी मदत होत आहे.

त्यांनी दिलेल्या प्रशिक्षण धड्याचे युवक-युवतींनी पुरेपुर लाभ घेतला आणि शासनाच्या गृह विभागाच्या पोलीस दलात निवड झाले.निवड झालेल्यांमध्ये कु.रजत अशोक चौधरी रा.कोहमारा,ता.सडक/अर्जुनी, कु.प्रियंका टीकाराम ताराम रा.शिवनी/चांदागड ता.कुरखेडा/गडचिरोली, कु.दयावंता वामन आळे,रा.रावनवाडी/कोरेगाव ता.वडसा जि.गडचिरोली कु.सुरज मडावी रा.आंभोरा/केशोरी,कु.निखिल नेवारे रा.केशोरी ता.अर्जुनी/मोरगाव जि.गोंदिया यांचे स्वातंत्र्य दिनी केशोरी पोलीस स्टेशन येथे ठाणेदार पोलीस निरीक्षक गणेश वनारे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी आय.आर.बी चे पोलीस निरीक्षक श्री.सोनटक्के,केशोरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक हर्षल भोळे, पो.ह.सुशील रामटेके,प्रशिक्षक तथा पोलीस शिपाई नितीन डुंबरे तसेच विद्यार्थांचे पालक आणि पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# गोंदिया जिल्ह्यातील तीन शेतकरी रेशीम रत्न पुरस्काराने सन्मानित




**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यातील तीन शेतकऱ्यांना वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांचे हस्ते नुकतेच रेशीम रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

रेशीम संचालनालय नागपूर आणि वस्त्रोद्योग आयुक्तालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथील नव निर्मित नियोजन भवन येथे १० व्या राष्ट्रीय हातमाग दिवसाचे औचित्य साधून तुती आणि टसर रेशीम उद्योगातून ज्यांची आर्थिक उन्नती एका वर्षात १ लक्ष रुपयांपेक्षा जास्त झाली आहे अशा यशस्वी शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. वस्त्रोद्योग विभागाच्या शासन निर्णयान्वये लक्षाधीश रेशीम शेतकऱ्यांना पुरस्कार देण्याविषयी शासनाकडून मान्यता देण्यात आली होती. नागपूर विभागातील प्रत्येक जिल्ह्यातून सन २०२२-२३ यावर्षात प्रती एकरी १ लक्ष रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवणाऱ्या शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामधून सर्वाधिक उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांची प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. प्रथम पुरस्कारासाठी ११ हजार रुपये, द्वितीय पुरस्कारासाठी ७ हजार ५०० रुपये व तृतीय पुरस्कारासाठी ५ हजार रुपये रोख रक्कम, शाल, श्रीफ्फळ, साडी आणि प्रशस्तीपत्र देऊन सपत्नीक सन्मान मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.गोंदिया जिल्ह्यातील टसर रेशीम उद्योगातून उन्नती झालेले शेतकरी प्रथम पुरस्कार विजेते मनोज जनार्धन बावणे, रा. ताडगाव ता. अर्जुनी/मोर., द्वितीय पुरस्कार कालिदास गोविंदा बावणे, रा. ताडगाव ता. अर्जुनी/मोर., तृतीय पुरस्कार एकनाथ लक्ष्मन मेश्राम, रा. ताडगाव ता. अर्जुनी/मोर. यांना "रेशीम रत्न" पुरस्कार देऊन त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

यावेळी रेशीम संचालीका वसुमना पंत, आयुक्त वस्त्रोद्योग अविष्यांत पंडा, व अतिरिक्त आयुक्त माधुरी चवरे खोडे, वस्त्रोद्योग उपसचिव श्रद्धा कोचरेकर, रेशीम विभागाचे उपसंचालक महेंद्र ढवळे, सहायक संचालक हेमंत लाडगावकर, कक्ष अधिकारी अंजुम पठाण उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रेशीम संचालनालय नागपूर अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.


## महाराष्ट्र शासन कार्यालय
## सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग चंद्रपूर ४४२४०९
## निविदा सुचना क्रं.२२/२०२४-२५

जा.क्र.१९९३/निविदा/२०२४ दि.०९.०८.२०२४

### नोटीस बोर्ड

कार्यक़ारी अभियंता सा.बां.(आ)विभाग, चंद्रपूर हे खालील कामाच्या मोहरबंद निविदा ब-१ प्रपत्रमध्ये आदिवासी विकास विभागातील योग्य त्या विद्युत वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागवित आहे. कोरी निविदा प्रपत्र रकाना क्र.७ मध्ये दर्शविलेल्या तारखेपर्यंत कार्यकारी अभियंता सा.बां.(आ.) विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयातून कामकाजाचे दिवशी विहिती किंमत भरून प्राप्त करुन घेता येईल. भरलेली निविदा प्रपत्र रकाना क्र.८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिनांकास १८.०० वाजता किंवा कार्यकारी अभियंता सा.बां.(आदी) विभाग, चंद्रपूर हे कळवतील त्या दिनांकास व वेळेस मोहरबंद निविदा या कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा खरेदी केल्यानंतर खरेदी केल्याची पावती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील. व कोरे निविदा प्रपत्र खरेदी केल्यावर निविदा प्रपत्र योग्य भरून स्वत:ची व साक्षिदाराची स्वाक्षरी सिलबंद लिफाफ्यात रकाना क्र.८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत (रू.लक्ष) | बयाना रक्कम | कामाचा कालावधी | कंत्राटदाराची वर्गवारी निविदा प्रपत्राची किंमत | कोरी निविदा प्राप्त करण्याचा कालावधी ठिकाण व दिनांक | भरलेली सिलबंद निविदा स्विकृतीचे ठिकाण व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | Providing water Proofing tratement to Girls Hostel & Misclaneous Sanitory Repairs at Govt.Tribal Ashram School Majitpur Ta.Gondia Dist. Gondia | 3,92,011/- | ४,०००/- | २ महिने | वर्ग ६ व त्यावरील रू.कि.५९०/- | दि.१६.०८.२०२४ ते २३.०८.२०२४ का.अ.(आ.) विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत | दि.२३.०८.२०२३ रोजी दुपारी १८.०० वाजेपर्यंत का.अ.(आ.) विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| 2 | Repairs to Plumbing at Kitchen & Misc.repairs to Girls Hostel at Govt Tribal Ashram School Kadikasa Ta.Deori Dist.Gondia | 3,21,490/- | ३,०००/- | २ महिने | वर्ग ७ व त्यावरील रू.कि.५९०/- | दि.१६.०८.२०२४ ते २३.०८.२०२४ का.अ.(आ.) विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत | दि.२३.०८.२०२३ रोजी दुपारी १८.०० वाजेपर्यंत का.अ.(आ.) विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| 3 | Repairs of plumbing of Girls & Boys Hostel at Govt,Tribal Ashram School Kakodi Ta.Deori Dist.Gondia | 3,54,847/- | ४,०००/- | २ महिने | वर्ग ७ व त्यावरील रू.कि.५९०/- | दि.१६.०८.२०२४ ते २३.०८.२०२४ का.अ.(आ.) विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत | दि.२३.०८.२०२३ रोजी दुपारी १८.०० वाजेपर्यंत का.अ.(आ.) विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| 4 | Repairs to WC Bath to Girls & Boys in school Building at Govt.Tribal Ashram School Palandur Ta.Deori Dist.Gondia | 3,51,816/- | ४,०००/- | २ महिने | वर्ग ७ व त्यावरील रू.कि.५९०/- | दि.१६.०८.२०२४ ते २३.०८.२०२४ का.अ.(आ.) विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत | दि.२३.०८.२०२३ रोजी दुपारी १८.०० वाजेपर्यंत का.अ.(आ.) विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| 5 | Repairs to Girls & Boys Hostel door, windows & plumbing at Govt.Tribal Ashram School Elda Ta.Arjuni Morgaon Dist.Gondia | 3,58,290/- | ४,०००/- | २ महिने | वर्ग ७ व त्यावरील रू.कि.५९०/- | दि.१६.०८.२०२४ ते २३.०८.२०२४ का.अ.(आ.) विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत | दि.२३.०८.२०२३ रोजी दुपारी १८.०० वाजेपर्यंत का.अ.(आ.) विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयात |

**अटी व शर्ती :** १. खालील कारणांमुळे आपली निविदा रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
१) निविदा प्रपत्राची सुस्पष्ट न दिसणारी प्रति २) अपूर्ण निविदा प्रपत्र (पान कमी असलेले) ३) निविदा प्रपत्रामध्ये कंत्राटदाराकडून छापील मजकूरामध्ये खोडतोड व बदल करणे. ४) निविदेसोबत जोडण्यात येणारे आवश्यक कागदपत्र राजपत्रित अधिकाऱ्याकडून साक्षांकित न केलेले कागदपत्र व अपूर्ण कागदपत्रे ५) निविदा खरेदी केल्यानंतर खरेदी केल्याची पावती निविदे सोबत सादर न करणे. ६) निविदेच्या लिफाफावर कामाचा संपूर्ण नाव व कंत्राटदाराचा संपूर्ण नाव पत्तेसहित व स्वाक्षरी न केलेले लिफाफे. **७) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) ५००/- स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात येत आहे. (टिप:-स्टॅपल केलेले लिफाफे स्विकारण्यात येणार नाही व सिलबंद लिफाफे सादर करावे.)**
२. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असल्याबाबतचे अद्यावत पंजीयन प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे अनिवार्य राहील. ३. बयाना (इसारा) रक्कम शेड्युल बँकेच्या एक वर्षमुदतीचे टर्म डिपॉझीटच्या स्वरूपात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आ.) विभाग, चंद्रपूर यांचे नावे जोडणे आवश्यक आहे. किंवा शासन सा.बां. विभाग निर्णय दिनांक २०.०४.१९९८ नुसार नविन नियमाप्रमाणे आवश्यक रक्कम भरुन बयाना रक्कम भरण्यापासून सुट प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच साक्षांकित प्रमाणपत्र लिफाफा क्र.१ मध्ये निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. ४. कामाची निविदा उघडण्याच्या दिनांकापासून ६० दिवस तथा कंत्राटदाराने लेखी सूचना देईपर्यंत विधीग्राह्य राहील. ५. निविदा विषयक सर्व साक्षांकित कागदपत्रे लिफाफ क्र.१ मध्ये सादर करावे व लिफाफा क्र.२ मध्ये भरलेली निविदा प्रपत्र सादर करावे.

प्रति, १) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयीन सुचना फलक
२) सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, नागपूर/गडचिरोली/आलापल्ली/चंद्रपूर
यांना माहितीस अग्रेषित.

**(वर्षा घुशे)**
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम(आदिवासी) विभाग चंद्रपूर

जिमाका/गोंदिया/जाहिरात/३८/२०२४,दि.१४/०८/२०२४





# लोककल्याणकारी योजना हाती घेऊन प्रगतीचा वेग वाढविण्यात यश-पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम

**गोंदिया :–** महाराष्ट्रात महायुती सरकारने प्रगती आणि विकासाच्या नव्या आशा व आकांक्षाची पायाभरणी केली आहे. लोकहिताचे निर्णय घेऊन सर्वसामान्य जनता, शेतकरी व समाजाच्या सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य शासन कार्य करीत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, युवा कार्य प्रशिक्षण योजना, तीर्थ दर्शन योजना, वयोश्री योजना, बळीराजा मोफत वीज योजना, अन्नपुर्णा योजना, मुलींना मोफ्फत शिक्षण, नुकसानग्रस्तांना मदत वाटप, आनंदाचा शिधा वाटप, ज्येष्ठ नागरिकांसाठी कल्याण मंडळ आदी योजना कार्यान्वित करुन महायुती सरकारने प्रगतीचा वेग वाढविण्यात यश संपादन करून सर्वसामान्य नागरिकांच्या विकासाला गती प्राप्त करुन दिली, असे प्रतिपादन राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी केले. पोलीस मुख्यालय येथे आयोजित स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य ध्वजारोहण समारोह कार्यक्रमात ते बोलत होते.





यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रारंभी पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी ध्वजारोहण करुन राष्ट्र ध्वजाला मानवंदना दिली. त्यानंतर मैदानावरील परेडचे निरीक्षण केले. पोलीस बँड पथकाने महाराष्ट्र गीत सादर केले. भारत राखीव बटालीयन पथक, पुरुष पोलीस दल, महिला पोलीस दल, होमगार्ड पुरुष पथक, होमगार्ड महिला पथक, माजी सैनिक दल, फुलचूर हायस्कुल भारत स्काऊट पथक, पोलीस बँड पथक व श्वान पथक यांनी परेडचे संचलन केले.

मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीणफ ही राज्य शासनाची महत्वाकांक्षी योजना असून गोंदिया जिल्ह्यात या योजनेला माता–भगीणींचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या योजनेत आतापर्यंत २ लाख ८४ हजार ८५६ लाडक्या बहिणी पात्र झाल्या आहेत. योजनेच्या लाभाचे दोन हप्ते रक्षाबंधनपूर्वी खात्यात जमा होणार आहेत. या योजनेतून कुठलीही बहीण वंचित राहणार नाही याची खबरदारी घेण्यात येत आहे. या योजनेत २१ ते ६५ वर्ष वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये आर्थिक लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील युवकांना शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरु करण्यात आली आहे. या योजनेत युवकांना शासकीय व खाजगी आस्थापनामध्ये प्रशिक्षणासह ६ ते १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. या योजनेतून प्रशिक्षीत युवा वर्ग निर्माण होणार आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यामध्ये महास्वयंम पोर्टलवर ३५६१ उमदवारांनी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. तसेच या योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील शासकीय उद्योजक आस्थापना यांनी १८९७ पदे व खाजगी उद्योजक आस्थापना यांनी २२० पदे असे एकुण २११७ पदे अधिसूचित केलेली आहेत असे पालकमंत्री म्हणाले.

महाराष्ट्रातील मुलींना आता शिक्षणाची संधी मोफ्फत मिळणार आहे. वकील, डॉक्टर, इंजिनियर यासारख्या उच्च पदव्यांसाठी आर्थिक अडचणी आता अडथळा ठरणार नाही. आपल्या मुलींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महायुती सरकर कटिबध्द आहे.

गेल्या काही वर्षात झालेल्या जागतिक वातावरणीय बदलामुळे अडचणीत आलेल्या साडेसात एचपी पर्यंतच्या शेती पंप ग्राहकांसाठी बळीराजा मोफत वीज योजना सुरु करण्यात आली असून याचा लाभ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार आहे. प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना तसेच मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या कुटूंबाला अन्नपूर्णा योजनेअंतर्गत वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. गौरी–गणपतीच्या सणानिमीत्त शंभर रुपयात जिल्ह्यातील पात्र कुटूंबांना 'आनंदाचा शिधा' वाटप करण्यात येणार आहे. हे प्रगतीचे आणखी एक पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले.

गोंदिया जिल्हा धान उत्पादक जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. शासकीय आधारभुत किंमत धान खरेदी योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम २०२३–२४ मध्ये १८३ धान खरेदी केंद्रामार्फ्फत ८० हजार ८०६ शेतकऱ्यांकडून २४ लाख ७७ हजार ९९० क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली. त्याची आधारभुत किंमत ५४० कोटी ९४ लाख रुपये ऑनलाईन पध्दतीने थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आले आहे. तसेच रब्बी हंगाम २०२३–२४ मध्ये भरडधान्य (मका) खरेदी ५५९ क्विंटल झाली असून ११ कोटी ६८ लाख रुपये शेतकऱ्यांना अदा करण्यात आल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्ह्याच्या विकासासाठी यावर्षी २६५ कोटी रुपये निधी मंजूर असून या निधीमधून जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करण्यास शासन कटिबध्द आहे. जिल्ह्यात १ ऑगस्ट पासून महसूल पंधरवडा सुरु असून या काळात नागरिकांना विविध दाखले, प्रमाणपत्र यासोबतच शासनाच्या योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळवून देण्यात आला असे सांगून पालकमंत्र्यांनी महसूल विभागाचे अभिनंदन केले.

यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर, उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, पोलीस उपअधीक्षक नंदिनी चानपूरकर यांचेसह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंजुश्री देशपांडे व राजन चौबे यांनी केले.

# नियोजन समितीच्या सभेत बोलू न दिल्याने अग्रवाल यांचा राजीनामा


## सभात्याग करीत केला निषेध: पालकमंत्र्यावर व्यक्त केली नाराजी

**गोंदिया:** जिल्हा नियोजन समितीची सभा बुधवारी (दि.१४) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी समितीचे विशेष निमंत्रीत सदस्य माजी आ. गोपालदास अग्रवाल यांना बोलण्यास मनाई केल्याने सभेचे वातावरण काही काळाकरिता तणावपूर्ण झाले होते. नियोजन समितीचे अध्यक्ष असलेल्या पालकमंत्र्यांच्या या भूमिकेचा निषेध नोंदवित गोपालदास अग्रवाल यांनी सभात्याग केला. त्यानंतर समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे नव्या वादाला सुरुवात झाली आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या सभेत सदस्याला प्रश्न उपस्थित करण्यापासून रोखण्याची गोंदिया जिल्ह्यातील इतिहासातील ही पहिलीच घटना असल्याचे बोलल्या जाते. माजी आ. गोपालदास अग्रवाल यांनी आपले काही प्रश्न उपस्थित करुन प्रश्नाचे समाधान करण्याची विनंती केली. मात्र पालकमंत्री आत्राम यांनी त्याचे समाधान करण्याऐवजी त्यांना बोलण्यास मनाई केली. त्यामुळे संतप्त माजी आ. गोपालदास अग्रवाल यांनी पालकमंत्रीच सदस्यांचे प्रश्न थांबवत असतील तर समस्यांचे समाधान कसे होणार, असे म्हणत सभात्याग करीत बाहेर गेले. त्यानंतर थेट राजीनामा दिल्याने जिल्ह्यात नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

### दुपारी सभा त्याग अन सायंकाळी पाठविला राजीनामा

**जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत बुधवारी (दि.१४) पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी या समितीचे विशेष निमंत्रित सदस्य गोपालदास अग्रवाल यांना सभेत बोलू दिले नाही. याचा निषेध नोंदवित गोपालदास अग्रवाल यांनी दुपारी सभात्याग केला.**



**गोपालदास अग्रवाल**

पूर्व सदस्य, महाराष्ट्र विधान मंडल

पूर्व समिति प्रमुख, लोकलेखा समिति, महाराष्ट्र विधान मंडल

पत्र क्रं.१०८७७/२०२४

दिनांक : १३ अगस्त २०२४

प्रति,

माननीय नामदार श्री देवेन्द्रजी फडणवीस,

उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन,

मंत्रालय, मुंबई

संदर्भ :– आज दि.१४ अगस्त २०२४ को गोंदिया जिला नियोजन समिति सभा।

विषय :– पालकमंत्री द्वारा गोंदिया जिला नियोजन समिति में आमंत्रित सदस्यों को बोलने न देने की तानाशाही भुमिका के निषेधार्थ गोंदिया जिला नियोजन समिति की आमंत्रित सदस्यता से राजीनामा।

माननीय महोदय,

गोंदिया जिला नियोजन समिति की दिनांक १४ अगस्त २०२४ की सभा में चर्चा के दौरान, जिले के आवश्यक लोकहित विषयों को योग्य कार्यवाही हेतु, प्रस्तुत करने पर, पालकमंत्री द्वारा "कोई भी आमंत्रित सदस्य सभा में नहीं बोल सकता", ऐसी रुलिंग दी गई, जो नियमबाह्य और लोकतंत्र के विरुध्द है। पालकमंत्री के इस तानाशाही आचरण का विरोध करते हुए, मैंने गोंदिया जिला नियोजन समिति (DPC) सभा का त्या[illegible]

गोंदिया जिला नियोजन समिति में सभी आमदार, खा[illegible] ही है। जिला परिषद गोंदिया के चुनाव के २ वर्ष बाद भी आज त[illegible] दिया जिला नियोजन समिति का चुनाव नहीं कराया गया।

पालकमंत्री की आमंत्रित सदस्यों के ना बोलने[illegible] जिसका मैं निषेध करता हूं एवंम गोंदिया जिला नियो[illegible] सदस्यता से राजीनामा देता हूं।

आपसे हमेशा मिले सहयोग के लिये आभार–[illegible]

आपका नम्र

(गोपालदास अग्रवाल)

प्रतिलिपी : जिलाधिकारी, गोंदिया

शंकर भवन, मुख्य मार्ग, गोंदिया – 441601

Email : agrawalmla@

**त्यानंतर सायंकाळी नियोजन समितीच्या सदस्य पदाचा राजीनामा दिला. त्यांनी आपला राजीनामा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविल्याचे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. आठ महिन्यांपुर्वी त्यांची राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशावरुन जिल्हा नियोजन समितीवर विशेष निमंत्रीत सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती. नियोजन समितीच्या सभेत सदस्याला बोलण्यापासून रोखणे हे लोकशाही विरोधी आहे. जनतेचे प्रश्न मांडण्यापासून रोखणाऱ्या पद्धतीचा मी निषेध नोंदवित सदस्य पदाचा राजीनामा देत असल्याचे माजी आ. गोपालदास अग्रवाल यांनी सांगितले.**

**नियोजन समिती सभेचा एका नियम असतो. प्रश्न विचारण्याचा अधिकारी प्रत्येक सदस्याला आहे. पण ते सभेच्या नियमानुसार असायला हवे. नियमाविरुद्ध असेल तर ते खपवून घेतले जात नाही. माजी आ. अग्रवाल यांची प्रश्न विचारण्याची पद्धत चुकीची असल्यामुळे त्यांना प्रश्न विचारण्यास मनाई केली. यानंतर ते या सभेतून निघून गेले.**

**धर्मरावबाबा आत्राम, पालकमंत्री गोंदिया**

# सावली येथील शाळेला पुरस्कार



**गोंदिया:–** सावली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने, मागील वर्षात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या राज्य शासनाच्यावतीने चालविण्यात आलेल्या महत्वाकांक्षी उपक्रमात हिरहिरीने सहभाग नोंदवून, नागपूर विभागात दुसरा क्रमांक पटकावून गोंदिया जिल्ह्याचा गौरव वाढविला. तसेच शाळेतील मुख्याध्यापक संदीप तिडके यांच्या मार्गदर्शनात व सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती मधील पदाधिकारी, ग्रामपंचायत मधील पदाधिकारी व सर्व ग्रामस्थ यांच्या संयुक्तिक सहकार्याने शाळा विविध स्तरावर काम करीत असून, जिल्हा परिषदतर्फे राबविण्यात आलेल्या विविध स्पर्धेत शाळेला पुरस्कार मिळालेले आहे. तसेच लोकसहभागातून सुद्धा अनेक कामे करण्यात आली असून शाळेने केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल स्वातंत्र्य दिनानिमित्त पालकमंत्री धर्मराव बाबा आत्राम वस्ती शाळेचा गौरव करण्यात आला.

जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, सावली येथे अनेक नानाविध उपक्रम सुरु आहेत. पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शाळेने स्वखर्चातून पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना ने–अण करण्यासाठी गाडी घेतली. एवढेच नव्हे, तर शाळेचे गुणवत्ता व भौतिक विकासात उंच भरारी घेत गोंदिया जिल्ह्यात स्वत:चा वेगळा ठसा उमटववलेला आहे. शाळेच्या या चमात्कारिक कामरिगीमुळेच स्वतंत्र दिनाचे औचित्य साधून पोलिस मुख्यालय येथे

शुक्रवारी संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात सावली शाळेतील शिक्षक वृंद व शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी यांचा जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते सम्मानचिन्ह व गौरवपत्रक देऊन सम्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर, मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुलगानंथन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर तानाजी लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर, शिक्षणाधिकारी अशोक लांडे, डी.बी. दिघोरे उपस्थित होते.

# कुऱ्हाडी जिल्हा परिषद परिसराची आढावा बैठक

**गोरेगाव:** गोरेगाव तालुक्यातील कुऱ्हाडी जि.प. परिसराची आढावा बैठक जिल्हा परिषद सदस्य शैलेश नंदेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक हुतात्मा जाम्या–तिम्या हुतात्मा स्मारक येथे आयोजित करण्यात आली होती. या आढावा बैठकीत आरोग्य, शिक्षण, कृषी, पंचायत, पाणीपुरवठा, महिला व बालकल्याण आणि बांधकाम विभागाच्या प्रमुखांनी आपापल्या विभागाचा आढावा मांडला. तसेच वर्षभरात झालेल्या विकासकामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी पंचायत समिती सदस्य नलिनी सोनवणे, सुप्रिया गणवीर, कुऱ्हाडीचे सरपंच अनिल मडावी, सर्व गावचे सरपंच, उपसरपंच, तहसील वैद्यकीय अधिकारी टेंभरे, विस्तार अधिकारी (पंचायत) बोरकर, विस्तार अधिकारी डॉ. कावळे, सर्व पंचायत समिती सदस्य, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, आरोग्य विभागाचे कर्मचारी, आशा वर्कर उपस्थित होते.

यावेळी कुऱ्हाडी जिल्हा परिषद क्षेत्रातील सुरु असलेल्या योजना व विकास कामांचा अढावा घेण्यात आला. ज्यामध्ये कृषी विभागाकडून गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. स्वच भारत अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा व अंगणवाड्यांमध्ये शौचालये बांधण्याच्या सुचना देण्यात आल्या. तसेच जल जीवन अभियानांतर्गत शाळा, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये नळ जोडणी वाढविण्याच्या सुचना देण्यात आल्या. मोडकळीस आलेल्या खोल्यांसोबतच नवीन खोल्यांच्या आराखड्यावरही शिक्षण विभागाच्या माध्यमातून चर्चा झाली. मुख्यमंत्री स्वच्छ व सुंदर विद्यालयाची १०० टक्के नोंदणी करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. जिल्हा परिषदेने



राबविलेल्या महात्मा फुले माझी आदर्श शाळा या निकषांची पूर्तता करुन सत्र २०२४–२५ साठी माई सिंधुताई सपकाळ आदर्श अंगणवाडी अंतर्गत परिसरातील १ शाळा व १ आदर्श अंगणवाडीची निवड करण्यात येणार आहे. संपूर्ण विभागाच्या सहकार्याने हा प्रकल्प राज्यात दिशादर्शक ठरेल, यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. संचालन ग्रामसेवक गौतम यांनी केले. तर आभार उपसरपंच नीरज दुबे यांनी मानले.

# बेशिस्त वाहनचालकांना ५५.६५ लाखांचा दंड

**गोंदिया:–** वाहतुकीस शिस्त लागावी, यासाठी जिल्हा वाहतूक शाखेतर्फ्फे बेशिस्त व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई केली जाते. त्याअंतर्गत वाहतूक शाखेने १ जानेवारी ते ३१ जुलै २०२४ या सात महिन्यांच्या कालावधीत ५५ लाख ६५ हजार ३५० रुपयांचा दंड ठोठावला आहे.शहरासह जिल्ह्यात वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु, वाहनचालकांकडून नियमांचे पालन होत नसल्याने वाहतूक कोंडीची समस्या तर निर्माण होतेच शिवाय, अपघातांनाही निमंत्रण मिळते. गेल्या सात महिन्यांत जिल्ह्यातील रस्त्यांवर १९६ अपघात झाले यात १०० लोकांचा मृत्यू झाला तर १५७ जणांना गंभीर दुखापत झाली. अपघात व अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमांचे उल्लंघन करणारे व बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली जाते.

वाहतूक नियम मोडणाऱ्या चालकांवर आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करणे व त्यांचा वाहन परवाना रद्द करण्याचे प्रस्ताव प्रादेशिक परिवहन विभागाकडे पाठवले जातात. त्यानुसार शहरासह जिल्ह्यात गत सात महिन्यांत सुमारे १२ हजार ५६८ प्रकरणात दंडात्मक कारवाई करीत त्यांच्याकडून ५५ लाख ६५ हजार ३५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

ही कारवाई विना हेल्मेट वाहन चालविणे, सीट बेल्ट न बांधणे, ट्रिपल सीट वाहण चालवणे, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करणे, अति वेगाने वाहन चालविणे, नो पार्किंगमध्ये वाहन उभे करणे आदी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करून दंड वसूल करण्यात आला.

**भरधाव वेगाने जाणारे वाहने आणि बेभान दुचाकीस्वार याबाबत सावध राहून आजूबाजूला लक्ष द्यावे. रस्त्यात नेहमी वाहने उभी केली जातात, ते टाळले पाहिजे. कारवाई करून दंड वसूल करणे हा तोडगा नाही. वाहनचालकांनीही वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. वाहतूक सिग्नल बंद असताना पोलिस वाहतूक नियंत्रित करीत असतात, अशावेळी वाहन चालकांनी सहकार्य करण्याची गरज आहे. प्रत्येकाने जर स्वतःची जबाबदारी ओळखून वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांवर नक्कीच नियंत्रण मिळविता येईल.**

**नागेश भास्कर , पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा गोंदिया**

### ५८.१३ लाखांची दंड रक्कम प्रलंबित

बेशिस्त चालकांवर ई चालन मार्फ्फत दंडात्मक कारवाई केली जाते. जानेवारी ते जुलै २०२४ या कालावधीत वाहतूक विभागाने केलेल्या १२५६८ प्रकरणांमध्ये ५५ लाख ६५ हजार ३५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

याच कालावधीत १०१३९ प्रकरणांमध्ये ५८ लाख १३ हजार ७५० रुपयांचा दंड रक्कम वाहन चालकांकडे प्रलंबित आहे. त्यासाठी वाहतूक शाखेतर्फ्फे संबंधित चालकांना नोटीस पाठवली जाते. लोक अदालतीतही या प्रकरणांचा निपटारा केला जातो.

# शिक्षण विभागात मिळणार १९७ तरुणांना रोजगाराची संधी

**गोंदिया:** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील रिक्त जागांवर जिल्ह्यातील १९७ तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे. अशी माहिती जि.प. उपाध्यक्ष यशवंत गणवीर यांनी दिली. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम विभाग आणि मुख्यमंत्री लोक कल्याण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.



नोकरीच्या शोधात असलेल्या १९७ तरुणांना शिक्षण विभागात ६ महिन्यांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे. या उपक्रमांतर्गत योयनेच्या लाभासाठी rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाइटवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ज्या उमेदवारांकडे डी.एड. आणि बी.एड. पदवी आणि पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असल्यास ते ऑनलाइन नोंदणी करु शकतात. योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्षे असावे. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा आणि नोकरी प्रशिक्षण कालावधी ६ महिने असेल. ६ महिन्यांच्या कालावधीसाठी पदवीधर उमेदवारांसाठी ८ हजार रुपये आणि पदव्युत्तर उमेदवारांसाठी १० हजार रुपये देण्यात येईल. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती यशवंत गणवीर यांनी केले आहे.

# झटपट मिळणार पासपोर्ट, तीन दिवसांत पोलिस व्हेरिफिकेशन

## परदेशवारीसाठी अडचणी झाल्या कमी, आठवडाभरात प्रक्रिया पूर्ण

**गोंदिया:** व्यापार, शिक्षण, नोकरी व अन्न विविध कारणांमुळे नागरिकांना परदेशात जावे लागते. यासाठी शासनाकडून पासपोर्ट मिळणे आवश्यक असते. पासपोर्ट प्राप्त करण्यासाठी अनेक दिवसांचा कालावधी लागायचा. यातही पोलीस व्हेरिफिकेशनची प्रक्रिया अनेक दिवस रेंगाळत असे, परंतु आता तीन दिवसांत पोलीस व्हेरिफिकेशन होणार आहे. यामुळे पासपोर्ट झटपट मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

परदेशात जाण्यासाठी पासपोर्ट तयार करावा लागतो. पासपोर्ट व्हेरिफिरेशनसाठी बराच वेळ लागत असे. आता हा वेळ कमी झाला आहे. केवळ ३ दिवसांत पोलीस व्हेरिफिकेशनची प्रक्रिया पूर्ण होईल. या नवीन नियमामुळे नागरिकांची मात्र सोय होणार आहे.

### पासपोर्ट जलदगतीने तयार

**पासपोर्ट तयार करण्याची प्रक्रिया सुलभ झाली आहे. आठवडाभरात पासपोर्ट तयार होतो. नवीन सॉफ्टवेअरमुळे काही दिवस अडचणी आल्या. परंतु आता दर आठवड्याला अधिकाधिक पासपोर्ट जलदगतीने तयार केले जात आहेत.**



### व्हेरिफिकेशनसाठी काय कागदपत्रे लागतात?

**पासपोर्ट तयार करण्यासाठी आधार कार्ड, जन्म प्रमाणपत्र, आई–वडीलांचे पासपोर्ट यांसह अन्य कागदपत्रे लागतात. आई–वडीलांचे पासपोर्ट नसल्यास पासपोर्टची फाइल करावी लागते. नागरिकांना पासपोर्टकरिता पोलीस पडताळणीच्या जटील प्रक्रियेचे पालन करावे लागेलच. पण ते सोपे केले आहे.**

### असा घटला अवधी

**पासपोर्टकरिता पोलीस व्हेरिफिकेशनसाठी मागील वर्षी १५ दिवसांचा कालावधी लागत होता. त्यानंतर हा कालावधी पाच दिवसांचा करण्यात आला होता. आता पुन्हा त्यात घट करण्यात आली आहे.**

**एका महिन्यात तयार होतात २५० पासपोर्ट**

**जिल्ह्यात एका महिन्यात २५० पासपोर्ट तयार केले जातात. एका आठड्यात जवळपास ५० हून अधिक पासपोर्ट तयार होतात.**

### वेबसाइटवर करा ऑनलाइन अर्ज

**पासपोर्ट तयार करण्यासाठी पासपोर्ट इंडिया या वेबसाइटवर अर्ज करावा लागतो. आवश्यक कागदपत्र अपलोड करावे लागतात. त्यानंतर आपल्या अर्जाची पडताळणी होते?**

### हेलपाटे थांबले

**परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना पासपोर्ट तयार करावा लागतो. आपल्या पासपोर्टचे व्हेरिफिकेशन झाले की नाही, याची उत्सुकता असायची. त्यांना वारंवार संबंधित कार्यालयात हेलपाटे मारावे लागत होते. तसेच चौकशी करावी लागत होती. आता हेपलाटे थांबणार आहेत.**

# हे विकासाचे नविन पर्व-प्रफुल्ल पटेल

**गोंदिया:–** माता, बहिर्णींना सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी महायुती सरकारने माझी लाडकी बहिण योजना लागू केली आहे. निःशुल्क उच्च शिक्षण देऊन त्यांचे भविष्य सुरक्षित करण्याची सरकारने संकल्प केला आहे.

महिलांना वर्षाला ३ सिलेंडर मुक्त मिळणार आहे. सरकार शेतकऱ्यांना कृषीची वीज मोफ्फत, युवा प्रशिक्षणच्या माध्यमातून विकासाचे नविन पर्व सुरु झाले असल्याचे मत राज्यसभा सदस्य प्रफुल्ल पटेल यांनी केले.

ते १४ ऑगस्ट रोजी तालुक्यातील नवेगाव धापेवाडा येथे आयोजित मेळाव्यात बोलत होते. यावेळी भाऊ–बहिणीचे नाते घट्ट करणारे सण रक्षाबंधनाच्या पर्वावर परिसरातील महिलांनी पटेल यांना तिलक व ओवाळणी करून राखी बांधली.



पटेल पुढे म्हणाले, नवेगाव व परिसरात खळबंदा जलाशयाचे पाणी मिळून शेतकऱ्यांना अनेक पिके घेता येतात. धान उत्पादक शेतकऱ्यांनी हेक्टरी २० हजार बोनस देण्याचे काम आमच्या सरकारने केले.शेतकरी, महिला, युवा याचे भविष्य उज्वल करण्यास सरकार कटिबध्द आहे. मेळाव्याला राजेंद्र जैन, प्रेमकुमार रहांगडाले, राजलक्ष्मी तुरकर, कुंदन कटारे, गणेश बरडे, केतन तुरकर, रजनी गौतम, घनश्याम मस्करे, रवी पटले, निरज उपवंशी, शंकरलाल टेंभरे, आरजू मेश्राम, उर्मिला लांजेवारंसह बहुसंख्येने कार्यकर्ता उपस्थित होते.